# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे- ४११०४४

PUNEMETROPOLIS New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune-411044

Ph No. : 020 259 33 344 / 356 / 333 / फोन नं ०२० २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: comm@pmrda.gov.in


---

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय** :- पुणे मेट्रो लाईन-३ (हिंजवडी-शिवाजीनगर) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ बी (२-१ ए) अन्वये महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प म्हणून घोषित केल्याने अतिरीक्त विकास शुल्क आकारण्याबाबत.

**संदर्भ**:-शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. पीआरडी -३३१८/प्र. क्र. ४९ (१)/नवि-७, दि. १८ जुलै २०१८.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) हद्दीमध्ये पुणे मेट्रो लाईन-३ (हिंजवडी-शिवाजीनगर) रेल्वे प्रकल्प राबविण्यास शासनाने मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रकल्पाचे काम प्रगती पथावर असून सदर प्रकल्प महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ बी (२-१अे) च्या प्रयोजनार्थ "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प" म्हणून शासनाकडील संदर्भ क्र. २ येथील अधिसूचनेव्दारे घोषित करण्यात आले आहे.

०२. उपरोक्त अधिसुचना निर्गत झाल्यानंतर विकास शुल्कामध्ये १००% वाढ लागू करणेबाबतची तरतुद खालीलप्रमाणे आहे:-

124 b (2-1A) **In respect of the area under the jurisdiction** of any Planning Authority Under this Act, where State Government declares its intention to undertake one or more **vital Urban Transport projects** the development charge levied and collected under the provisions of sub-section (२) **shall be increased by one hundred percent.**

उपरोक्त तरतुदीनुसार, संदर्भीत अधिसुचना निर्गत केलेनंतर, संबंधीत नियोजन प्राधिकरणाच्या **संपूर्ण कार्यक्षेत्रासाठी**, नियमित जे विकास शुल्क लागू आहे ते १००% नी वाढ करून वसुल करणे आवश्यक आहे.

०३. सबब, उपरोक्त नुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या (PMRDA) पूर्ण कार्यक्षेत्रातील जमिनींवरील विकास / बांधकाम परवानगी मंजूरी वेळी नियमित आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्काच्या १००% वाढीव विकास शुल्क आकारण्याची कार्यवाही दिनांक १७/०४/२०२३ पासून सुरू करण्यात यावी.

ज्या प्रकरणामध्ये विकास शुल्काची चलने निर्गत केली आहेत अथवा करावयाची आहेत अशा सर्व प्रकरणांमध्ये उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

जा. क्र. पीएमआरडीए /वि.पं.वि. /परिपत्रक/ ११५२

दिनांक १७/०४/२०२३

१७.४.२३

(राहुल महिवाल)

महानगर आयुक्त

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी

Scanned with OKEN Scanner